


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २९३ वा ❑ गुरूवार दि.२२ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## मराठी ज्ञान, रोजगाराची भाषा व्हावी-लक्ष्मीकांत देशमुख

### 'डिजीटल युगातील लेखन'वर कार्यशाळा दिडशे अभ्यासकांचा सहभाग

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : इंग्रजीच्या तुलनेत आजही प्रादेशिक भाषेतील डिजीटल स्वरुपातील ज्ञान, माहितीचे प्रमाणे कमी आहे. मराठी ज्ञानभाषा, अर्थार्जनाची भाषा करण्यासाठी डिजीटल स्वरुपातील माहितीचे प्रमाण खुप वाढविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात डिजिटल युगातील कोशीय लेखन या विषयावर वर दोन दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सहकार्यातून आयोजित या कार्यशाळेत दिडशे भाषा अभ्यासकांनी सहभाग घेतला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय व इंटरनॅशनल सटर ऑफ एक्सलेन्स इन इजिनियरिंग ॲरड मॅनेजमेंट (आयसीम) यांच्या संयुक्त विद्यमाने सिफार्ट सभागृहात या कार्यशाळेचे उद्घाटन सोमवारी (दि.१९) करण्यात आले. डिजिटल युगातील कोशीय लिखाण : संकल्पना तंत्र आणि स्वामित्व हक्क' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.



मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. मंचावर लक्ष्मीकांत देशमुख, माजी कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर. डॉ. राहूल देशमुख यांची उपस्थिती होती. ज्येष्ठ लेखक लक्ष्मीकांत देशमुख (अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती) हे माहिती तंत्रज्ञानाचा मराठी ज्ञानभाषा निर्मितीतील योगदान' तर दुपारच्या सत्रात प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ.पंडित विद्यासागर (माजी कुलगुरू) यांचे 'वैज्ञानिक कोशीय लिखाण' या विषयावर भाषण झाले. या कार्यक्रमास संयोजक प्राचार्य डॉ.संजय डंभारे , प्राचार्य डॉ.रत्नदीप देशमुख, संचालक प्रा.सचिन देशमुख, डॉ.स्नेहा खोब्रागडे यांची उपस्थिती होती.

यावेळी संयोजक डॉ.सचिन देशमुख, प्राचार्य डॉ.रत्नदीप देशमुख, प्राचार्य डॉ.संजय डंभारे व समन्वयक डॉ.स्नेहा खोब्रागडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले, मराठी भाषेत मोठया प्रमाणावर ज्ञान भांडार उपलब्ध आहे. मात्र आजही ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात इंग्रजीतून च ज्ञानाचा साठा मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. विश्वकोश, ज्ञानकोश, पक्षीकोश, समाजविज्ञान कोश आदींनी मराठीची समृध्दी वाढविली मात्र आंग्ल भाषेत सध्या उपलब्ध असलेली ज्ञान मराठीत अनुवादीत करावे लागणार आहे. तसेच 'ई-विश्वकोश' सारखे उपक्रम हाती घेणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

**मराठीवर प्रेम, इंग्रजीवर भरवसा : डॉ.विद्यासागर**

मराठी भाषेवर मातृभाषा म्हणून आपले प्रेम निश्चित आहे. मात्र नोकरी, रोजगारासाठी इंग्रजी भाषेवर जास्त भरवसा असल्याचे माजी कुलगुरु डॉ.पंडित विद्यासागर म्हणाले. कोणतीही भाषा चिरंतन ठेवायची असेल तर ती लोकभाषा व ज्ञानभाषा असली पाहिजे. संस्कृत सारख्या विषयात मोठे ज्ञान उपलब्ध होते, मात्र ती लोकभाषा न झाल्याने आज भाषा लोप पावत असल्याचे उद्हारणही त्यांनी दिले. अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या मराठीत साहित्य लेखन, संशोधनपर वृत्तपत्रीय लेखन तसेच समाज माध्यमावरील लेखन आणखी मोठया प्रमाणावर व डिजीटल स्वरुपात उपलब्ध करुन द्यावे लागेल, असेही डॉ. विद्यासागर म्हणाले. डिजीटल स्वरुपातील कोशिय लेखनासाठी काळमर्यादा समोर ठेऊन काम करणे गरजेचे आहे, असे मा.कुलगुरू डॉ. अध्यक्षीय समारोपात म्हणाले. विश्वकोश निर्मिती मंडळाच्या या उपक्रमात विद्यापीठाचा सक्रिय सहभागी राहील, असेही ते म्हणाले.

तर सर्व प्रकारची माहिती अद्ययावत व विश्वासार्ह माहिती उपलब्ध करुन देत असल्याचे डॉ.राहुल देशमुख म्हणाले. गेल्या ५० वर्षात विश्वकोशाचे २० खंड प्रकिाशित असून, डिजीटल स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आल्याचे डॉ. स्नेहा खोब्रागडे यांनी सांगितले. दोन दिवसातील दहा सत्रात कार्यशाळा होणार असून दिडशे संशोधक सहभाग झाल्याचे संयोजक डॉ.सचिन देशमुख यांनी सांगितले. डॉ.मुक्ता धोपेश्वरकर यांनी सूत्रसंचालन तर डॉ.कल्पना खंडागळे यांनी आभार मानले.

## काळा गणपती मंदिर भजन महोत्सवात स्वरसाधना भजन मंडळाला बहुमान

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - सिडको एन-१ येथील काळा गणपती मंदिर परिसरात तीनदिवसीय भजन महोत्सव विविध संघांच्या सादरीकरणाने चांगलाच गाजला. पहिल्याच दिवशी ७ तासांच्या कालावधीत ३३ महिला भजनी मंडळांतील ३५० महिलांनी भक्ती गीते सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. स्वरसाधना भजन मंडळाच्या भजनालाही रसिकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. स्वरसाधन मंडळालाही महोत्सवात भजन सादर करण्याचा बहुमान मिळाल्याचे संगीता कोठावळे यांनी सांगितले.

भजन महोत्सवाचे उद्घाटन भक्ती गणेश ट्रस्टचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, सचिव एस. एम. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी माधुरी धोंड, उदय कहाळेकर, पं. सुधीर बहिरगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महोत्सवात यंदा ४० हून अधिक संघ सहभागी झाले आहेत.

प्रत्येक मंडळाला २० मिनिटांचा अवधी देण्यात आला होता. त्यात गणपती भजन, संतांचे अभंग आणि गवळणी तसेच




भारूड आदी प्रकारातील भजने सादर करण्यात आली. अबीर गुलाल उधळीत रंग, देव माझा विठू सावळा, नेहमीच म्हणता फुरसत नाही यांसारख्या भजनांनी वातावरण भक्तीरसाने न्हावून निघाले.

स्वरसाधना भजनी मंडळासह भक्ती गणेश भजनी मंडळ, जय हनुमान सेवा मंडळ, गजर जगदंबेचा, भारत माता शिव सेवेकरी भजनी मंडळ, सिद्धिविनायक भजनी मंडळ आदी अनेक संघांनी एकाहून एक अभंग, गवळणी, भारूड सादर करून महोत्सवात रंग भरले.

_महोत्सवाचे स्वरूप

गेल्या ३५ वर्षांपासून हा भजन महोत्सव आयोजिण्यात येतो. या वर्षी स्पर्धेचे स्वरूप बदलून सहभागी होणाऱ्या प्रत्येक मंडळाला सन्मानपूर्वक मानधन दिले जात आहे. सहभागी होणाऱ्या प्रत्येक मंडळाला ११०० रुपये रोख मानधन दिले जाते. तीन दिवसांत सुमारे १०० भजनी मंडळे महोत्सवात सहभागी झाली होती. सहभागी सर्व भजनी मंडळांना १ लाख रुपयांहून अधिक रकमेचे मानधन वितरित करण्यात आल्याचे संयोजकांनी सांगितले.









## विशेष लेख...

## किडनी तस्करी:मृत्यू नेटवर्कचा गोरखधंदा

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

मानवी तस्करी ही गुलामगिरीचा एक आधुनिक प्रकार आहे. ती बहुतेकदा आंतरराष्ट्रीय स्वरूपाची असते आणि त्याचे बळी सर्व लिंग आणि वयोगटातील लोक असतात. अलीकडे

आंतरराष्ट्रीय किडनी तस्करी चा प्रकार समोर आल्याने परत एकदा मानवी अंगाच्या होणाऱ्या तस्करीवर चिंता व्यक्त केली जात आहे.

भारतात १९९४ मध्ये मानवी अवयवांच्या बेकायदेशीर व्यापाराला आळा घालण्यासाठी एक कायदा करण्यात आला. भारतात मानवी अवयवांच्या बेकायदेशीर व्यापारासाठी ५ ते १० वर्षे तुरुंगवास आणि २० लाख ते १ कोटी रुपये दंडाची शिक्षा आहे. दरम्यान, मानवी ऊतींच्या तस्करीसाठी एक ते तीन वर्षांचा तुरुंगवास आणि ५ ते २५ लाख रुपयांचा दंड आहे. इतके कडक कायदे असूनही, भारतात मानवी अवयवांचा व्यापार सुरूच आहे.

मानवी अवयवांच्या व्यापारात सहभागी असलेले लोक निष्पाप आणि गरिबांना बळी पडतात. ते गरिबांना पैशाचे आमिष दाखवून त्यांचे अवयव विकण्यास सांगतात. किडनींना सर्वाधिक मागणी आहे.एका अहवालानुसार, एक किडनी सुमारे १ कोटी रुपयांना विकली जाते. गरजेनुसार ही किंमत बदलू शकते. दात्याला फक्त ३ लाख रुपये मिळतात. उर्वरित पैसे हा बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांमध्ये विभागले जातात.

महाराष्ट्रातील चंद्रपूरच्या रस्त्यावरून येणाऱ्या एका असहाय्य शेतकऱ्याच्या आक्रोशाने केवळ देशाला हादरवून सोडले नाही तर सात समुद्रापार पसरलेल्या अवयव तस्करीच्या भयानक सिंडिकेटचा पर्दाफाश केला. याला फक्त ''किडनी चोरी'' असे म्हणणे या गुन्ह्याच्या गांभीर्याचे कमी लेखणे ठरेल. प्रत्यक्षात, मानवी अवयवांसाठी हा एक क्रूर आंतरराष्ट्रीय बाजार आहे, जिथे गरिबी आणि असहाय्यतेचा उघडपणे व्यापार केला जातो. निष्पाप आणि गरीब लोकांच्या शरीरांना क्षुल्लक किमतीत नष्ट करणारा हा बेकायदेशीर व्यापार आता एका आंतरराष्ट्रीय कटाच्या रूपात उदयास आला आहे ज्याची मुळे सीमा ओलांडून परदेशात पसरली आहेत.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका शेतकऱ्याच्या व्हिडिओमुळे भारत आणि कंबोडियामधील आंतरराष्ट्रीय किडनी तस्करी रॅकेटचा एक खळबळजनक खुलासा झाला आहे. महाराष्ट्राच्या चंद्रपूर पोलिसांच्या सतर्कतेने दिल्लीपासून तामिळनाडूच्या त्रिचीपर्यंत पसरलेल्या मृत्यू नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे. या बेकायदेशीर व्यापारात केवळ धूर्त मध्यस्थच नाहीत तर प्रतिष्ठित वैद्यकीय संस्थांमधील डॉक्टर देखील सामील आहेत. या टोळीचा सूत्रधार कृष्णा, किडनीची तातडीने गरज असलेल्या श्रीमंत रुग्णांना ओळखण्यासाठी देशभरातील प्रमुख रुग्णालयांना भेटी देत असे, तर तो आर्थिकदृष्ट्या कमकुवत व्यक्तींना त्याच्या जाळ्यात अडकवण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करत असे.

पासादरम्यान, पोलिसांना असे आढळून आले की काही डॉक्टर देखील या रॅकेटमध्ये सहभागी होते. या व्यावसायिक डॉक्टरांवर किडनीसाठी गरजू रुग्णांकडून ५० ते ८० लाख रुपयांपर्यंतची प्रचंड रक्कम उकळल्याचा आरोप आहे, ज्यामुळे ही मानवीय शोकांतिका धोक्यात आली. दरम्यान, गरज नसताना अवयव दान करणाऱ्या गरीब दात्यांना फक्त ५ ते ८ लाख रुपये देण्यात आले. यातील मोठा निधी कृष्णा, आणि या भ्रष्ट डॉक्टरांच्या खिशात गेला. भारत आणि कंबोडियामधील हे नेटवर्क किती काळापासून सक्रिय आहे आणि आतापर्यंत किती निष्पाप लोक प्रभावित झाले आहेत याचा तपास चंद्रपूर पोलिस आता करत आहेत.

लोकांच्या असहाय्यतेचा फायदा घेत तो त्यांना कंबोडियाला घेऊन जायचा, जिथे त्यांच्या किडन्या बेकायदेशीरपणे काढल्या जात होत्या. आतापर्यंतच्या तपासात असे दिसून आले आहे की कृष्णाने १० ते १२ लोकांचे किडनी काढले होते, जरी पोलिसांना संशय आहे की ही संख्या खूप जास्त असू शकते, जी सध्या पडताळणी केली जात आहे.

दिल्ली, पंजाब आणि तामिळनाडू: घरगुती दुवे

या रॅकेटमध्ये दिल्लीतील प्रसिद्ध सर्जन डॉ. रविंदर पाल सिंग आणि तामिळनाडूतील त्रिची येथील स्टार किम्स हॉस्पिटलचे एमडी डॉ. गोविंदस्वामी यांना मुख्य आरोपी म्हणून नाव देण्यात आले आहे. भारतातही अनेक बेकायदेशीर प्रत्यारोपण या डॉक्टरांच्या देखरेखीखाली झाल्याचा आरोप आहे.

चंद्रपूर किडनी रॅकेट प्रकरणातील पंजाब कनेक्शन प्रामुख्याने आरोपी आणि पीडितांच्या ओळखीवरून समोर आले आहे. तपासादरम्यान, या आंतरराष्ट्रीय टोळीचा सक्रिय सदस्य हिमांशू भारद्वाज हा पंजाबमधील मोहाली येथील रहिवासी असल्याचे उघड झाले. पोलिसांच्या तांत्रिक तपासात असेही समोर आले आहे की हिमांशू भारद्वाज, जो स्वतः एक किडनी दाता आहे, त्याने आर्थिक अडचणींमुळे सोशल मीडियाद्वारे टोळीचा प्रमुख कृष्णाशी संपर्क साधला.

या बेकायदेशीर व्यवसायातील कमिशन गेम देखील धक्कादायक आहे. सुरुवातीला कृष्णाला प्रत्येक किडनीसाठी १ लाख रुपये कमिशन मिळत होते. तथापि, त्याचा प्रभाव आणि नेटवर्क वाढत असताना, तो लोकांना कंबोडियाला घेऊन जाऊ लागला आणि नंतर देशात बेकायदेशीरपणे किडनी काढू लागला. या काळात, तो प्रत्येक किडनीसाठी १५ ते २० लाख रुपयांचे मोठे कमिशन मिळवत होता. कृष्णाने या बेकायदेशीर उत्पन्नातून अनेक बेनामी मालमत्ता देखील मिळवल्या आहेत. चंद्रपूर पोलिस सूत्रांचे म्हणणे आहे की या प्रकरणात अनेक पीडित किडनी देणगीदारांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत, जे या रॅकेटच्या दुव्यांशी जोडण्यात महत्त्वाचे ठरत आहेत. सध्या, पोलिस या नेटवर्कमध्ये सहभागी असलेल्या इतर डॉक्टर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या भूमिकेचाही सखोल तपास करत आहेत.




# जात्यावरच्या ओव्या......

हिरव्या झाडाखाली
कोण रुसून बसली?
राणी दुरल्या देशाची
राजा भेटता हसली ||४६०||

आली आली सकरात
तिळगुळा आला भाव
गोड बोलण फुकाच
सये ध्यानामंधी ठेव ||४६१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# हुशार बबू माकड




**ज्योतिर्मय साहित्य**

(आजचे उगवतीचे रंग खास छोट्या दोस्तांसाठी ! आपल्या घरातील लहान मुलांना जरूर वाचायला द्या किंवा वाचून दाखवा.)

उन्हाळ्याचे दिवस होते. कडक ऊन पडले होते. जंगलात सगळीकडे कोरडं कोरडं झालं होतं. पाणी मिळणं कठीण झालं होतं. जंगलातील पाण्याचे सगळे स्रोत आटले होते. हरणं, ससे, पक्षी आणि माकडं सगळेच तहानलेले होते. जंगलातील एका तलावात मात्र पाण्याचा भरपूर साठा होता.

एके दिवशी माकडांची एक टोळी पाणी पिण्यासाठी त्या तलावाकाठी आली.

''चला चला आधी पाणी पिऊया,'' टोळीचा म्होरक्या म्हणाला.

सगळी माकडं आनंदाने तलावातलं थंडगार पाणी प्यायला. पाणी पिऊन झाल्यावर सगळी माकडं जवळच असलेल्या जांभळीच्या झाडावर चढली. झाडावर भरपूर गोड जांभळं लागलेली होती.



या टोळीत बबू नावाचं एक छोटं माकड होतं. बबू खूप हुशार होता पण तसाच खोडकरही...! जांभळीच्या झाडाची एक फांदी तलावावर झुकली होती आणि त्या फांदीला भरपूर जांभळं लागली होती. पण ती फांदी नाजूक आणि कमजोर होती.

''अरे बबू, फार टोकाला जाऊ नकोस!''

''ती फांदी कमजोर आहे!''

सगळी माकडं त्याला सांगत होती.

पण बबू कुठला ऐकतोय ?

''मला फांदीच्या टोकावरची ती मोठी, टपोरी गोड जांभळं हवीत!'' असं म्हणत तो झाडाच्या अगदी टोकावर गेला.

आणि सगळ्यांना जी भीती होती तीच खरी ठरली. मोठ्याने धपकन असा आवाज झाला

फांदी तुटली आणि बबू थेट तलावात पडला!

तलावात चिखल होता, तुटलेल्या फांद्या होत्या.

बबू प्रचंड घाबरला.

तो हातपाय हलवत होता. तलावाच्या बाहेर येण्यासाठी त्याची धडपड सुरू होती.

''अरे बापरे! आता काय करायचं?''

खूप हातपाय मारून झाल्यावर तो कसाबसा एका मोठ्या दगडापर्यंत जाऊन पोहोचला.


तो खूप थकला होता. दम लागला होता.

थोडावेळ तो शांत बसला आणि विचार करू लागला. मग त्याला आईचे शब्द आठवले. आई त्याला सांगायची ''बबू अरे, कोणताही कठीण प्रसंग आला तरी घाबरायचं नाही. थोडा वेळ शांत बसायचं. शांत डोक्याने विचार करायचा मग आपल्याला त्यातून बाहेर पडण्याचा काहीतरी मार्ग नक्कीच सुचतो.''

''खरं आहे. घाबरून उपयोग नाही,'' बबू मनात म्हणाला.

''आधी शांत व्हायचं मग मार्ग सापडतो!'' **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# द्वैतकल्पनानिरसन

**ज्योतिर्मय साहित्य**

शेजारी, नातेवाईक, मित्रपरिवार, त्यांच्याही पुढे जाऊन समाजाचा विचार करतो. जीवनात आनंद, श्रद्धा, त्याची मुल्ये, ऊत्तमोत्तम जीवन जगण्यासाठी त्याच्या मनाच्या कल्पना, त्यासाठी करावी लागणारी धडपड यशस्वी होण्यासाठी करावे लागणारे कष्ट, मेहनत,सतत डोक्यावर असणारे सद्विचारांचे गाठोडे आणि हे सर्व सांभाळत असताना आपल्या सारख्या प्रापंचिक माणसांना घरातील वातावरण, जोडीदाराची मदत फार महत्त्वाची असते.

द्वैतकल्पनानिरसन या समासात शुध्द कल्पनेपासून स्वतःचे अज्ञान नाहीसे करावे व जगाचे कल्याण करावे अशा स्वरूपात मोलाचा सल्ला समर्थ देतात.

विज्ञानपंडितांनी निर्माण केलेली विलक्षण सुक्ष्म यंत्रेआपल्या दैनंदिन जीवनात घडून आणलेल्या सुधारणा कल्पनेच्या सामर्थ्यवान विचाराने सिध्द झालेल्या आहेत. समर्थ सांगतात की विनाकारण वेळ वाया घालवण्यापेक्षा माणसाने तो वेळ स्वतःच्या सुधारणेकडे वळवावी. जग बदलण्याची वाट पहात बसण्यापेक्षा स्वतः बदल करावेत.माणूस बदलण्यासाठी त्याचे मन बदलणे गरजेचे आहे. मन कल्पनाप्रधान असल्याने कल्पनांची रचना व तऱ्हा बदलली की मनही आपोआपच बदलते. ''मी देहच आहे'' हा मोठेपणा नाकारून ''मी आत्माच आहे ''असे समजून मानवी मनातील द्वेत आणि अद्वैत, ज्ञान आणि अज्ञान, ब्रम्ह आणि माया हे सर्व मनच निर्माण करते.

शुध्द सात्त्विकता अंगी बाणवून जीवन जगता आले पाहिजे.

माणसाचे मन चंचल असते ते संकल्पही करते व विकल्पही करते.

संकल्प म्हणजे काय?


मन जेव्हां ब्रम्हाची कल्पना करते तेव्हा ती खरी असते तिला संकल्प म्हणतात.

विकल्प म्हणजे काय?

मन जेव्हा मायेची कल्पना करते तेव्हा ती खोटी असते तिला विकल्प म्हणतात. ब्रम्ह आणि माया, संकल्प आणि विकल्प या दोन्हींचा मेळ मन चंचल असल्याने बसत नाही.

**(क्रमशः)**

# भगवंताचे होण्यास आपण निर्दोष असणे जरूर आहे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

भगवंताचे समाधान आम्हाला न मिळण्याचे कारण, आम्ही ज्याचे आहोत असे वाटते ते आम्हाला सोडता येत नाही; प्रपंच आम्हाला हवासा वाटतो. जगाच्या तोंडाकडे पाहून समाधान मिळेल असे आपल्याला वाटते. ही प्रपंचाची आणि जगाची आस सोडून भगवंताचे दास झाल्याशिवाय आम्हाला समाधान मिळणे कठीण आहे. हे दास्यत्व येण्यासाठी भगवंताच्या प्राप्तीची उत्कंठा आम्हाला लागणे जरूर आहे. ही उत्कंठा यावी तरी कशी ? भगवंताचे होण्यासाठी आम्ही अगदी निर्दोष असणे अवश्य आहे. हे निर्दोषपण येण्यासाठी, आपण खरोखरच जसे नाही तसे जगाला दिसू नये. मनाने नेहमी शुद्ध असावे. आपण खरोखर चांगले नाही असे आपल्याला कळत असतानासुद्धा लोक आपल्याला चांगले म्हणतात, याची आम्हाला खंत वाटणे जरूर आहे. जगात आपले वागणे असे असावे की, आपल्याविषयी दुसऱ्या कुणाला शंकाही येता कामा नये. ढोंग मुळीच करू नका. आचारविचाराने इतके पवित्र झाल्यानंतर मग आम्हाला भगवंताचे का बरे होता येणार नाही ?

भगवंताचे झाल्यावर आम्हाला काळजीचे काही कारण आहे का ? आपण सर्वजण ' आम्ही भगवंताचे आहोत ' असे म्हणतो आणि काळजी करतो, हे किती विपरीत आहे ! ही प्रपंचाची काळजी नाहीशी होण्यासाठी, प्रपंचातले सर्व वैभव, धनदौलत ही आपली कर्तबगारी नसून, ती रामाच्या इच्छेने आली आहे असे आम्ही म्हटले पाहिजे. ' माझा प्रपंच तुझ्या इच्छेने चालला आहे, तू ठेवशील त्यात मी समाधानात राहीन, ' अशी आमची वृत्ती बनायला पाहिजे. यासाठी मोठे वैराग्य पाहिजे असे नाही. खरोखर, ते वैराग्य, त्याग, वगैरेंच्या भानगडीत तुम्ही पडू नका. भगवंत ठेवील त्या परिस्थितीत समाधानात राहाणे यासारखे दुसरे वैराग्य कोणतेही नाही. ज्याच्यामध्ये भगवंताचा विसर पडेल, त्याच्यावर वैराग्य करा. ज्याच्यामध्ये भगवंताची आठवण राहील, तो विवेक समजून आचरणात आणा. प्रपंच उत्तम करा, पण त्याच्या अधीन होऊ नका. अधीन होणे हे पाप आहे, प्रपंच करणे हे पाप नाही. शक्य तितके धर्माचे पालन करा; नीती प्राणाबरोबर सांभाळा; आणि प्राण गेला तरी नामाची धुगधुगी राहू द्या, इतके नाम तुम्ही सांभाळा. या तीन गोष्टी तुम्ही सांभाळा. गोंदवल्याला तुम्ही इतकी मंडळी येता, मला संकोच असा वाटतो की, इतका पैसा खर्च करून, इतक्या अडचणी सोसून, इतके कष्ट करून तुम्ही येता, तर बरोबर काय घेऊन जाता ? काहीतरी बरोबर घेऊन जाऊन आचरणात आणा. नामस्मरणात तुम्ही सगळ्यांनी राहा. नामाकरिता नाम घ्या. नाम घेऊन काही मागू नका, राम कल्याण केल्याखेरीज राहणार नाही.

आपल्याला कोणी चांगले म्हटले तर आपल्या जीवाला धक्का बसून लगेच नामाची आठवण व्हावी.



## श्री संत ज्ञानेश्वर
## अभंग व अर्थ

अभंग २६

एकांति बाळा । कीं सोहंसुखशयन वेळा ।
पाहे चरणकमळा । सुंदराचे ॥
तेथें अरुण उदेला । कीं सुमन प्रगटला ।
कमळणी जाला । अंतरीं विकासु ॥
तें चरण कमळकेवळ । भक्त आळिउळ ।
सेविती सकळ । योगिजन ।
तेणें तृप्त जालें । कीं हृदय वोसंडले ।
म्हणोनि वाहावलें । ज्ञानडोहीं ।
तेचि ते परमानंद गे माय ॥१॥
न संगवे माय । परा पारुषली ।
दोंदिल दृष्टी जाली देखणेंपणें ॥
मनाचा अंकुर उगीच मुराला ।
तो कृष्णचि होऊन ठेला । अनुभविया ॥धृ०॥
तये पदांग्रीचे रज । तेणें तृप्ति वो सहज ।
वरि त्रिवेणी ऊर्ध्व व्रज । मज पाहतां ॥
ते तंव रेखा । वरि सखोल देखा ।
त्यावरी वोळले पीयूषपाणी ॥ तयेचेनि मार्गें ।
उध्दरणें जगें । म्हणोनि संतसंगें । तया सोई ॥
ते दोहीं भागीं। विस्तारलें जगीं ।
म्हणोनि तया भागीं । चरणांगुष्ठ ॥
दृष्टीचा डोळा । न निवडेच बाळा ।
तेथें जाला एकवेळा । मुनिजनां गे माये ॥२॥
तेथें बिंबलीं नखें । कीं विवळणी विशेखें ।
काळेपणाचेनि द्वेषं । वाहावलीं पुढां ॥
उगमींच संचले । कीं वियोगें वाहावले ।
पुनरपि जडले । कृष्णपदीं ॥
गंगा अंगुष्ठधार । कीं वांकिचा बडिवार ।
तेथें सप्तही स्वर । उमटताती ॥
स्वरुपीं रमली । म्हणोनि अधोमुख जाली ।
शोभती घाघुरली । पायीं प्रभावळी गे माये ॥३॥
तंव ते निजानंद भरितें। नेणती आणिकांतें ।
विसरली आपणातें । हास्यवदनें ॥
म्हणती नेति नेति गर्जना। कीं माणिका खेवणा ।
घोट्या अनुमाना । बाळसूर्यों ।
पोटरिया निवाळा । कीं उभलिया सरळा ।
जानुद्वय सोज्वळा । उच्चस्तंभ ॥
उंच युगुळ कटीं । माज सामावे मुष्टीं ।
सोहं समदृष्टी । दोहीं भागीं गे माये ॥४॥
वरि वेढिला पिंवळा । कीं मिरवे सोनसळा ।
कीं कल्पतरु फुलेला । नाभिस्थानीं ॥
तेथें वेधु गोपिबाळा । कीं अंतरीं सांवळा ।
पालवी मेखळा । अभिलाखिया ॥
तेथें मदनु गूढपणें । रतिशये रमणे ।
दुजे अनुभउ अनुभवणें । न निवडे केंही ॥
सखोल नभमंडळ । तें ब्रह्मस्थान केवळ ।
कैसे पाहाले विवळ । तेथें जगामागी गे माये ॥५॥
क्रमशः......



## आरोग्य संजीवनी

# रात्रीचे जेवण, झोप आणि आयुर्वेद

**ज्योतिर्मय साहित्य**

आयुर्वेदानुसार आहार (जेवण) आणि निद्रा (झोप) हे निरोगी आयुष्याचे दोन मुख्य स्तंभ मानले जातात. रात्रीचे जेवण आणि झोप यांचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे. चुकीच्या वेळी जेवणे किंवा चुकीच्या पद्धतीने झोपणे यामुळे पचन बिघडून अनेक आजार उद्भवू शकतात.

आयुर्वेदानुसार रात्रीच्या जेवणाचे आणि झोपेचे काही महत्त्वाचे

नियम खालीलप्रमाणे आहेत :

१. रात्रीच्या जेवणाची वेळ

सूर्यास्तानंतर लगेच: आयुर्वेदानुसार सूर्यास्तानंतर १-२ तासांच्या आत जेवणे उत्तम मानले जाते. शक्यतो रात्री ७ ते ८ च्या दरम्यान जेवण उरकावे.

उशिरा जेवण टाळा: रात्री उशिरा जेवल्याने अन्नाचे पचन नीट होत नाही, ज्यामुळे शरीरात आम (विषारी घटक) तयार होतो.

२. आहार कसा असावा?

- हलका आहार (लघु आहार): रात्रीचे जेवण दुपारच्या जेवणापेक्षा हलके असावे. मुगाची खिचडी, सूप, किंवा कढण यांसारखे पदार्थ उत्तम.

- दही टाळावे: रात्री दही खाणे आयुर्वेदात निषिद्ध मानले जाते, कारण ते कफ वाढवते आणि स्त्रोतसांमध्ये (चॅनेल्स) अडथळा निर्माण करू शकते.

कमी प्रमाणात जेवा :

पोट पूर्ण भरण्याऐवजी थोडे रिकामे ठेवावे (पोटाचा १/४ भाग हवेसाठी मोकळा असावा).

३. जेवण आणि झोप यातील अंतर

किमान ३ तासांचे अंतर :

जेवल्यानंतर लगेच झोपू नये. जेवण आणि झोप यामध्ये किमान ३ तासांचे अंतर असावे. यामुळे अन्न पचायला पुरेसा वेळ मिळतो.

शतपावली (१०० पावले चालणे) :

जेवल्यानंतर लगेच झोपण्याऐवजी किमान १०० पावले संथ गतीने चालावे. यामुळे पचनक्रिया सुधारते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

४. झोपण्याची योग्य पद्धत

डाव्या कुशीवर झोपणे (वामकुक्षी) :

रात्री झोपताना डाव्या कुशीवर झोपणे आरोग्यासाठी फायदेशीर असते. यामुळे जठराग्नी प्रदीप्त राहतो आणि पचन नीट होते.

वेळेवर झोपणे :

रात्री १० वाजेपर्यंत झोपणे उत्तम. रात्री १० ते २ ही काळ पित्त काळाचा असतो, ज्यामध्ये शरीर अंतर्गत पचन आणि दुरुस्तीचे काम करते.

लक्षात ठेवण्यासारख्या काही महत्त्वाच्या गोष्टी:

५ काय करावे । काय टाळावे

- कोमट पाणी प्यावे.
- रात्री थंड किंवा फ्रीजमधील पदार्थ खाऊ नका.
- जेवण शांतपणे चावून खावे.
- जेवताना टीव्ही किंवा मोबाईल पाहू नका.
- झोपण्यापूर्वी अर्धा तास स्क्रीन (मोबाईल) बंद ठेवा.
- रात्री खूप तिखट किंवा तेलकट पदार्थ खाऊ नका.

टीप: रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास कोमट दूध (हळद टाकून) घेतल्यास शांत झोप लागण्यास मदत होते.

****



# लघु बोधकथा

**बाप आणि मुली**

एका गृहस्थाला दोन विवाहित मुली होत्या व त्या दोघीही एकाच गावात राहत होत्या. एका मुलीचे लग्न व्यवसायाने कुंभारकाम करणा-या मुलाशी झाले होते तर दुसरीचे लग्न शेतकरी मुलाशी झाले होते. दोघींचेही संसार अगदी सुखात चालू होते.

एके दिवशी कोणत्यातरी कारणाने त्या दोघीही मुली आपल्या माहेरी परत आल्या तेव्हा वडिलांनी मुलींना विचारले,''तुमचे दोघींचेही कसे काय सुरु आहे? आपल्या संसारात दोघीही सुखी आहात ना.'' शेतक-याशी लग्न झालेली मुलगी म्हणाली,'' बाबा मी सर्व दृष्टींनी सुखी आहे. तुम्ही देवभक्त आहात म्हणून तुम्हाला एक सांगते की, माझ्यासाठी एक विनंती देवाकडे करा की यंदा पाऊसकाळ जरा लवकर सुरु होऊ दे म्हणजे आमच्या शेतात भाजीपाला चांगला पिकेल व आम्हाला जरा चांगले उत्पन्न मिळेल.'' हे ऐकताच कुंभाराकडे लग्न होऊन गेलेली मुलगी म्हणाली,'' बाबा हिच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही देवाची मुळीच प्रार्थना करू नका. उलट तुम्ही देवाला अशी विनंती करा की निदान येता एक महिना तरी पाऊस पाडू नकोस म्हणून. कारण माझ्या धन्याला मडकी पक्की भाजण्यासाठी आवे लावता येतील आणि चांगली भाजलेल्या मडक्यांना बाजारात चांगला भाव मिळून आम्हाला चांगले उत्पन्न मिळेल.'' दोन मुलींच्या या परस्परविरुद्ध मागण्या ऐकून 'काय करावे' हे कळेनासे होऊन तो गृहस्थ मुलींना म्हणाला,'' मुलींनो मी तुमच्या दोघींचीही विनंती देवाकडे सांगतो पण यात निर्णय काय घ्यायचा तो देवालाच घेऊ दे.''

तात्पर्य – जेव्हा आपल्याच माणसांकडून आपल्याला परस्परविरुद्ध गोष्टी करण्यासाठी गळ घातली जाते तेव्हा कुठलीच गोष्ट न करणे हे हितावह ठरते.

# प्रसन्न-आल्हाददायक ललित लेखन - चंद्रचाहूल


ज्योतिर्मय साहित्य

मनीषा कुलकर्णी - आष्टीकर या मराठवाड्यातील परभणीच्या साहित्यिका आहेत. पुणेकर झालेला मीही एक परभणीकर आहे.

माझ्या गावकरी असलेल्या मनीषा कुलकर्णी मराठवाड्यातील एक आश्वासक लेखिका-कवयित्री म्हणून सातत्यपूर्ण अशी वाटचाल करीत आहेत, ही माझ्यासाठी अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

इंटरनेट माध्यमामुळे मनीषा कुलकर्णी यांचे साहित्य वाचकांच्या भेटीस अधिक प्रभावीपणे येत असल्यामुळे या नव्या साहित्य-विश्वात त्यांच्या लेखनास वाचक - मान्यता मिळाली आहे.

लेखिका मनीषा कुलकर्णी यांच्या साहित्याचा मी एक नियमित वाचक आहे. ''चपराक '' परिवाराचे आम्ही लेखक-कवी आहोत, हा अक्षर-योग सांगण्यासारखा आहे.




लेखक-संपादक आणि प्रकाशक व मित्र श्री. घनश्याम पाटील यांच्या चपराक प्रकाशनाने लेखिका मनीषा कुलकर्णी-आष्टीकर यांच्या पहिल्या-वाहिल्या साहित्यकृतीस आकर्षक - स्वरूपात सादर केले आहे. ''चंद्रचाहूल'' लेख-संग्रह त्यातील वाचनीय ललित-लेखांमुळे वाचकांच्या पसंतीस पात्र ठरेल''असा मला विश्वास वाटतो.

१६ डिसेंबर २०२५ ला ''चंद्र चाहूल'' हा १४४ पानांचा संग्रह प्रकाशित झाला आहे.चपराक प्रकाशनाच्या या पुस्तकाचे मूल्य रु.२५०/- असून ज्योती घनश्याम यांनी संग्रहास साजेसे मुखपृष्ठ केले आहे.

अनुक्रमणिका नसल्याने या पुस्तकातील छोट्या-मोठ्या लेखांची संख्या सांगणे सोपे नाही. असे असले तरी हे सर्वच लेख वाचतांना ''मनातील आठवणींना पुन्हा उजाळा मिळाला आहे'' असे वाचकांना वाटेल.

भावनिक हळवेपणा'' हा या लेखनाचा लोभस गुण आहे.

लेखिका मनीषा कुलकर्णी दोन पिढ्यांची सांगड घालणारी अशी मधल्या-पिढीची संवेदनशील अशी प्रतिनिधी आहे. मध्यस्थाची ही भूमिका लेखिकेने जबाबदारीने निभावली आहे'', जुन्या पिढीतल्या श्रेयस गोष्टी अलगदपणे नव्या पिढीला उलगडून दाखवल्याआहेत.

लेखनातील सहजता, विषयाला अनुसरून केलेली शब्द-योजना मनाला भावणारी आहे. नाते-आणि नातेवाईक, परिवारातील व्यक्ती यांची शब्द-चित्रे लेखिकेने आपलेपणाने रेखाटली आहेत.

लेखिकेच्या मनातील भक्तीभावना हाही या लेखनाचा मोठा प्रासादिक गुण आहे'' याची प्रचिती देणारे अनेक लेख''चंद्र चाहूल'' संग्रहात आहेत..

उदा-

''जनी नामयाची रंगली कीर्तनी'' (पृ-१४), ''राधा - कृष्ण'' (पृ.१८), ''कृष्णसखी (पृ.४१), ''राधा बिना कृष्ण आधा'' (पृ.६१), ''भक्तगणांचा मेळा, आषाढी सोहळा (९३), ''प्रेम : राधा-कृष्णाचं, (पृ.१०४), ई.

मला आवडलेला लेख-

राधा होण्यासाठी काय लागतं (पृ-१०९) राधा होण्यासाठी स्वतःच अस्तित्व विसरावं लागतं.

रंगून जावं लागतं श्यामरंगात. दुधात साखर विरघळल्यावर तिचं अस्तित्व जसं दिसत नाही तसं विरघळून जावं लागतं. कृष्णार्पण व्हावं लागतं.

लेखिका मनीषा कुलकर्णी ग्रामीण परिसरातील शाळेत अध्यापनाचे कार्य करतात. नव्यापिढीशी

संवाद साधणाऱ्या या शिक्षिकेच्या व्यक्तिमत्वात एक सजग लेखिका आहे, एक चौकस कवयित्री आहे , जी आपल्या विद्यार्थ्यांना ''जीवन-मूल्यांची'' शिकवण देण्यास सदैव तत्पर आहे'', ही असोशी लेखनाला अधिक मौलिकता आणते.

काही लेखांची शीर्षके:

''जगण्याची शर्यत (पृ.२४), ''शाळेचा पहिला दिवस'' (पृ.५५), ''प्रार्थना'' (पृ.८७), ''उमलत्या कळ्या''(११२), ई.



**अरुण वि.देशपांडे-पुणे**
**9850177342**

''चंद्रचाहूल'' संग्रहाचे सुंदर, ललीतरम्य लेखन- स्वरूप सिद्ध करणारे अनेक लेख वाचून वाचकांना स्मरण-रंजनाच्या आनंदाने प्रसन्न वाटेल.

लेख शीर्षके:

माझी रांगोळी, माझे गीत (पृ.७), ''छान किती दिसते फुलपाखरू'' (पृ.११), माहेरचा जास्वंद, सासरच्या दारी (२६), पारिजात (३१), तन भी सुंदर मन भी सुंदर (पृ.५१), चंद्र (६८), नदीच्या कविता.. नदीची गाणी ( पृ.९५), नदी (पृ.९९), सुगंधी वाटा (पृ.१२३), आठवणी (पृ.१४०). ई.

बहुसंख्य लेखांचा शेवट काव्यमय ओळींनी करून लेख काव्यमय केला आहे, या ओळींना वाचक मनोमन दाद देईल हे नक्की.

लेखक-प्रकाशक-संपादक श्री.घनश्याम पाटील यांनी पाठराखण करतांना म्हटले आहे की-''साध्या - सोप्या विषयांची ललित अंगाने मांडणी करतांना त्यांनी जे शब्द सौन्दर्याचे दर्शन घडविले आहे ते विलोभनीय आहे.

वाचकांच्या मनात चैतन्याचे नंदादीप तेवत ठेवण्याची क्षमता असलेल्या या गुणी लेखिकेस माझ्या शुभेच्छा.

वाचक-मित्रहो श्री घनश्याम पाटील यांच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे.

लेखिका मनीषा कुलकर्णी आष्टीकर यांच्या ''चंद्रचाहूल'' या पहिल्या पुस्तकाचे जोरदार स्वागत व्हावे'' अशा शुभेच्छा देतो.

चंद्रचाहूल (ललित लेख संग्रह)
पृ.१४४, मूल्य-२५०/-
मनीषा कुलकर्णी-आष्टीकर
संपर्क- ९५११८७५३५३
प्रकाशक- घनश्याम पाटील
चपराक प्रकाशन,बावधन (बु) पुणे.
संपर्क-७०५७२९२०९२

# कलियुग कुणाचा? उथळ लोकांचा ?

ज्योतिर्मय साहित्य

''कलियुग'' हा शब्द उच्चारताच आपल्या मनात लगेच अराजक, स्वार्थ, अनैतिकता, अधः पतन अशी अनेक नकारात्मक चित्रे उभी राहतात. अनेकदा आपण सहज म्हणतो आजचा काळच खराब आहे, कलियुग आहे म्हणून असे होत आहे. पण खरोखरच हा काळ दोषी आहे का? की काळाला दोष देत देत आपण स्वतः ची जबाबदारी झटकतो आहोत? म्हणूनच प्रश्न अधिक नेमका होतो कलियुग कुणाचा? आणि उत्तर अधिक बोचरे ठरते उथळ लोकांचा !




कलियुग हा वृत्तीचा परिणाम आहे. काळ तर नेहमीच तटस्थ असतो. तो साक्षी असतो, निर्णायक नाही. माणसाच्या विचारांची, मूल्यांची, आचरणाची पातळीच काळाला ''सुवर्णयुग'' किंवा ''कलियुग'' बनवते. जिथे विचार खोल असतात, तिथे काळ कितीही कठीण असला तरी माणुसकी टिकून राहते. पण जिथे विचार उथळ असतात, तिथे साधा काळही विकृत रूप धारण करतो. असे तर नसेल हे?

उथळपणा म्हणजे काय? उथळपणा म्हणजे क्षणिक फायद्यासाठी दीर्घकालीन मूल्यांचा बळी देणे. उथळपणा म्हणजे विचार न करता प्रतिक्रिया देणे, ऐकण्याऐवजी ओरडणे, समजून घेण्याऐवजी निर्णय ठोठावणे. उथळ माणूस सत्यापेक्षा सोयीला महत्त्व देतो, कर्तव्यापेक्षा हक्कांची भाषा करतो, आणि आत्मपरीक्षणाऐवजी दुसऱ्यावर दोषारोप करतो.

आजच्या काळात साधनांची कमतरता नाही. माहितीचा महापूर आहे, तंत्रज्ञानाची प्रचंड प्रगती आहे, संधींची रेलचेल आहे. तरीही अस्वस्थता, असंतोष, मत्सर, द्वेष वाढतो आहे का ? कारण काय? साधने वाढली, पण समज वाढली नाही? माहिती वाढली, पण प्रज्ञा कमी झाली? संवाद वाढला, पण संवेदना हरवली? असे असेल तर हे सारे उथळपणाचे लक्षण आहे.

उथळ लोकांना झटपट यश हवे असते, पण मेहनत नको असते. प्रसिद्धी हवी असते, पण काम नको असते. अधिकार हवेत, पण जबाबदारी नको असते. प्रत्यक्षात ती माणसांची मानसिकता असते.

इतिहास पाहिला तर लक्षात येते प्रत्येक युगात सज्जन होते, दुर्जन होते. संघर्ष होते, अन्याय होते. पण तरीही काही युगे ''सुवर्ण'' मानली गेली, कारण तेव्हा समाजात विचारांची खोली होती, मूल्यांची निष्ठा होती, आणि आत्मसंयम होता. आजही ते शक्य आहे. पण त्यासाठी उथळपणाला नकार द्यावा लागेल.



डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर
पुणे मो. 98500 74418

बाह्य बदलांपेक्षा आंतरिक परिवर्तन आवश्यक आहे. विचारांना खोली द्यावी लागेल, कृतीला प्रामाणिकपणा जोडावा लागेल, आणि जीवनाला मूल्यांची दिशा द्यावी लागेल. प्रश्न असा नाही की काळ कसा आहे? प्रश्न असा आहे की आपण कसे आहोत?

म्हणूनच ठामपणे म्हणावेसे वाटते कलियुग कुणाचा? उथळ लोकांचा!

ज्या दिवशी माणूस पुन्हा विचारशील, संवेदनशील आणि मूल्यनिष्ठ बनेल, त्या दिवशी हाच काळ नव्या अर्थाने उजळून निघेल.







# शिव कांची - कांचिपुरम

ज्योतिर्मय साहित्य

अयोध्या, मथुरा, माया (हरिद्वार) काशी, कांची, अवंतिका, पुरी, द्वारावती (द्वारका) चैव सप्तता मोक्षदायीका

या सात नगरांचे दर्शनाने मोक्ष प्राप्ती होते. अशा पवित्र नगरी पैकी कांचीपुरम या स्थळास आज आपण भेट देणार आहोत. कांचीपुरम हे शहर चेन्नई पासून ७० किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. व ते रेल्वे व बस अशा सर्व सोयींनी भेट देण्यास सुलभ असे शहर आहे. कांचीपुरम याला १००० मंदिरांचे शहर या उपाधीने ही ओळखले जाते. जे महत्त्व वाराणसीला उत्तर भारतात आहे. तेच महत्त्व कांचीपुरमला दक्षिणेत आहे. कांचीपुरम येथे प्रामुख्याने तीन देवतांची मंदिरे प्रख्यात आहेत एक शिव, दोन विष्णू व तीन पार्वती. यातील शिव मंदिरांच्या समूहाला शिव कांची असे म्हणतात. तर विष्णू मंदिराच्या समूहाला विष्णू कांची असे संबोधण्यात येते. वास्तविक ही दोन्हीही, म्हणजे, शिव कांची व विष्णू कांची ही कांचीपुरम येथे एकाच शहरात आहेत.

लेखाचा विस्तार भयामुळे या लेखात शिवकांची ची मंदिरे याबद्दल आपण माहिती घेऊ.

१) एकंबरेश्वर मंदिर

दक्षिण भारतामध्ये पाच ठिकाणी एकेक महाभूताचे असे पाच तत्त्वांची मंदिरे आहेत. यापैकी पृथ्वी तत्वाचे मंदिर हे एकंबरेश्वर मंदिर आहे. या मंदिराचा इतिहास खूप प्राचीन आहे. सहाव्या ते सातव्या शतकात पल्लव राजा द्वारा या मंदिरात बांधकाम झाले, असा उल्लेख आहे. यानंतर विजयनगरच्या साम्राज्यात येथे १७२ फूट उंच असे देखणे गोपूर बांधण्यात आले. हे मंदिर ४० एकर परिसरात पसरले आहे.

हे मंदिर विशाल असून पाषाणात याची निर्मिती झाली आहे. याच्या भोवतीचे परिक्रमा मार्ग किंवा गल्ली या अतिशय लांब असून सर्व स्तंभावर उत्तम उत्तम शिल्पे कोरलेली आहेत.

आंब्याचे विस्मीत करणारे झाड

या मंदिराच्या परिसरात एक अति प्राचीन म्हणजे किमान साडेतीन ते चार हजार वर्षांपूर्वीचे बहरलेले आंब्याचे झाड आहे. या झाडाचे वैशिष्ट्य असे की याच्या प्रत्येक फांदीस ऋतूमध्ये वेगवेगळ्या रंगाची व वेगवेगळ्या चवीची आंब्याची फळे लागतात. या झाडाखाली बसूनच पार्वतीने शिव आपले पती व्हावेत म्हणून तपश्चर्या केल्याची आख्यायिका आहे. पार्वतीची परीक्षा घेण्यासाठी भगवान महादेवांनी तिथे अग्नी उत्पन्न केला, तरीही पार्वती माता ढळली नाही. तेव्हा त्यांनी गंगेला म्हणजे वेगवती नदीला प्रचंड प्रपाता सह मंदिरात घुसविले, पण पार्वती मातेने जे शिवलिंग माती व वाळू पासून तयार केले होते, ते स्वतःच्या हृदयाशी कवटाळून, त्याचे रक्षण केले, पण आपले व्रत तुटू दिले नाही. तिच्या या अजोड भक्ती पुढे प्रसन्न होऊन, महादेवांनी तिच्याशी विवाह केला.

आजही भक्त लोक ज्यांची विवाहेच्छा आहे, ते या झाडाचे दर्शन घेतात व आपली विवाह आहे इच्छा या झाडाजवळ व्यक्त करतात. आणि ही इच्छा पूर्ण होते, अशी मान्यता आहे. एकांबरेश्वर मंदिराच्या परिसरातच नीला थिंगल थुंडम पेरूमल मंदिर आहे.


उत्सव :- १) पंगुनी उथिरम मार्च एप्रिल या दरम्यान हा उत्सव साजरा होतो. हा येथील सर्वात महत्त्वाचा उत्सव समजल्या जातो. या उत्सवात शिवपार्वती यांच्या विवाहाचे स्मरण होते. याशिवाय महाशिवरात्री, ब्रह्मोत्सवम ,प्रदोष, अमावस्या व पौर्णिमा या दिवशी विशेष अनुष्ठाने होतात. येथील दैनिक पूजेसह सर्व वैदिक विधी संगीत वातावरणात होतात. पुराण काळी संत सबंधर, अप्पार, सुंदरर या अलवर संतांनी या मंदिरात भेटी दिल्या व भगवंताच्या आराधनेत त्यांनी विविध स्तोत्रे रचली. या स्तोत्रांचे गायन येथे केल्या जाते.


(क्रमशः)









# सांस्कृतिक अस्मितेचे चैतन्य-सोमनाथ स्वाभिमान पर्व

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतातील गुजरात राज्यामध्ये सागरकिनारी असलेले सोमनाथ मंदिर हे त्याच्या अफाट संपत्तीमुळे आणि अलौकिक धार्मिक महत्त्व मुळे ऐतिहासिक दृष्टीने लक्षणीय आणि वैशिष्ठ्यपूर्ण म्हणून ओळखले जाते. सुमारे १३०० वर्षापासून विनाश आणि पुनर्बांधणीच्या चक्रातून हे मंदिर टिकून राहिले आहे. जानेवारी २०२० मध्ये गजनीच्या मेहमूदाने केलेल्या पहिल्या मोठ्या हल्ल्यास शंभर वर्षे होत आहेत, त्यामुळे सोमनाथ स्वाभिमान पर्व हा चार दिवसाचा राष्ट्रीय उत्सव योगतेने साजरा करण्यात आला या मंदिरावर १००० वर्षात १७ वेळा हल्ले करण्यात आले तरीही हे मंदिर भारतीय संस्कृतीचे सत्व आणि स्वत्व टिकवून जबरदस्त खंबीरपणे उभे आहे इसवी सन ७२५ मध्ये उमयाद खलिफा याचा सरसेनापती सिंधचा अरब राज्यपाल जुनेद याने सोमनाथ मंदिरावर पहिला हल्ला केला होता. त्यानंतर १०२६ मध्ये गजनीच्या मेहमूदाने या मंदिरावर हल्ला केला. आणि या प्रसिद्ध हल्ल्यात त्याने अंदाजे वीस दशलक्ष किमतीचे सोने लुटले आणि दाग दागिने सुद्धा मिळविले शिवाय दुष्ट बुद्धीने ज्योतिर्लिंग ही फोडले आणि मंदिराचे अवशेष जाळपोळ करून उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला त्यानंतर अल्लाउद्दीन खिलजीच्या सैन्याने गुजरात वर आक्रमण केले तेव्हा कर्ण राजा राज्य करत होता १३९५ या वर्षी गुजरात सुलतानाचा संस्थापक जाफर खान मुजफ्फर शहा पहिला याने तिसऱ्यांदा या मंदिरावर हल्ला केला १४५१ साली गुजरातचा सुलतान मेहमूद बेगडा यानेही मंदिराची विटंबना करण्याचा प्रयत्न केला होता. तसेच १५४६ मध्ये गोव्यात असलेल्या पोर्तुगीज सैन्याने किनारपट्टीवर हल्ला केला तेव्हा सोमनाथ सह अनेक मंदिरे उध्वस्त केली. १६६५ मध्ये आणि १७०६ मध्ये मुघल सम्राट औरंगजेबाने अनेक वेळा हे मंदिर पाडण्याचा आदेश दिला होता, त्याच्या १७०६ च्या आदेशामुळे मंदिर पाडण्यात आले आणि त्याचे मशिदीत रूपांतर करण्यात आले होते, या हल्ल्यानंतर स्थानिक हिंदू शासकांनी मंदिराची पुनर्बांधणी करण्याचे सातत्याने प्रयत्न केले. उल्लेखनीय जीर्णोद्धारामध्ये या मंदिराची उभारणी करण्याचे प्रयत्नही लक्षणीय होते. ११६९ मध्ये राजा कुमार पाल यांनी लाकडी रचनेच्या जागी एक भव्य दगडी वास्तू शिल्प उभारले त्यानंतर १७८३ मध्ये मुघल काळात पूजा सुरू ठेवण्यासाठी राणी अहिल्याबाई होळकर यांनी अवशेषाजवळ एक लहान मंदिर उभारले आणि सोमनाथ मंदिराला



पुनर्जीवित केले. १९५१ मध्ये स्वातंत्र्यानंतर भारताच्या गृहमंत्र्यांनी म्हणजेच पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे आधुनिक मंदिराची पुनर्बांधणी करण्यात आली आणि या पुनर्रचित मंदिराचा लोकार्पण सोहळा तेव्हाचे राष्ट्रपती डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांच्या उपस्थितीत संपन्न झाला होता. २०२६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र



प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर
मोबाईल नं. 9225313592
ई-1108, कल्पतरू,
ग्लोरिया ग्रेस,
बावधन, पुणे

मोदी यांच्या नेतृत्वाखाली सोमनाथ स्वाभिमान पर्व हा ऐतिहासिक उपक्रम राबविण्यात आला आणि विजयाचे प्रतीक म्हणून भव्य सोहळा आयोजित करण्यात आला. जीर्णोद्धाराची ७५ वर्षे ही आगामी वर्षात वर्षभर विविध उपक्रमांनी साजरी केली जाणार आहेत. हे ऐतिहासिक स्फूर्तीदायक कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अष्टपैलू नेतृत्वाखाली संपन्न झाले आहे त्यामुळे भारताच्या इतिहासाचे एक नवे सोनेरी पान लिहिले जात आहे.

भारतामध्ये १४ ज्योतिर्लिंगापैकी सोमनाथ हे भारतीय लोकांच्या हृदयामध्ये परम आदराचे स्थान असलेले पहिले ज्योतिर्लिंग आहे.

गुजरातच्या सीमेवर वेरावल नजीक असलेले सोरटी सोमनाथ मंदिर हे भारतीय संस्कृती अभिमानाचे अखंड आणि सातत्यपूर्ण सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक बनले आहे. या मंदिराभोवती असलेल्या लोकांच्या अपार श्रद्धा भावातून हे मंदिर युगानयुगे भारताच्या राष्ट्रीय अस्मितेचा प्रकाश देत आहे. आणि या प्रकाश पर्वात सारा देश न्हावून निघत आहे.

**सहस्रकाचा तेजस्वी इतिहास**

''सोमनाथ स्वाभिमान पर्व'' हा भारतीयांनी आपल्या परम आदरणीय सांस्कृतिक प्रतीकाच्या रक्षणासाठी केलेल्या अपूर्व ऐतिहासिक संघर्षाचा हा तेजस्वी इतिहास आहे. आपली संस्कृतीक मूल्ये जतन करणे हा भारतीय राष्ट्रवादाचा आत्मा आहे. त्यामुळे गेल्या हजार वर्षात भारतीयांनी आपल्या अस्मितेचे रक्षण करण्यासाठी रक्त सांडले, अनेक हुतात्म्यानी त्यासाठी रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग म्हणून राहणार, पण केले या साऱ्यांच्या त्याग आणि समर्पणातून आज सोमनाथ अभिमानाने मान ताठ करून उभे आहे. त्याच्या इतिहासाचा सुवर्ण प्रवाह मोठा गौरवशाली आहे स्फूर्तीदायक आहे आणि तेवढाच तो सतत नव्या जीवन प्रेरणा देणार आहे. इस १० से २६ मध्ये मेहमूद गजनीने सोरटी सोमनाथ मंदिरावर पहिला मोठा हल्ला केला त्याला हजार वर्षे पूर्ण होत आहेत, आठ ते ११ जानेवारी दरम्यान हा राष्ट्रीय स्मरण उत्सव साजरा होत आहे स्वातंत्र्यानंतर १९५१ मध्ये सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाले या जीर्णोद्धाराचा ७५ वा वर्धापन दिवस साजरा होतो आहे.

**नव्या चैतन्य पर्वाची साक्ष**

पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी अत्यंत दूरदृष्टीने आयोजित केलेला हा सोमनाथ स्वाभिमान उत्सव म्हणजे भारताच्या वाढत्या सांस्कृतिक सामर्थ्याचे प्रतीक म्हटला पाहिजे. जय सोमनाथ हा नारा या महापर्वात देशभर घुमत राहिला आणि त्यामुळे अन्याय अत्याचार करणाऱ्या अपप्रवृत्ती विरुद्ध लढण्यासाठी प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रीयत्वाची ज्योत प्रज्वलित करण्याचे कार्य सोमनाथ स्वाभिमान पर्वामुळे शक्य झाले आहे.

**आक्रमणाशी लढाई व संघर्ष**

सोमनाथ मंदिरावर गजनीचा महमूद याने १०२६ मध्ये पहिले आक्रमण केले आणि मंदिर लुटले आणि हजारो रक्षकांना ठार मारले या क्रूर हल्ल्यानंतर तेराशे अकरा मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने या मंदिरावर आक्रमण केले.

(क्रमशः)

# २०२६ मध्ये २६ नवीन ग्रंथालये उभारण्याचा संकल्प

## २६ जानेवारीला शेवता गावात २ ग्रंथालयांचे उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - रीड अँड लीड फाउंडेशनच्या वतीने मरियम मिर्झा यांनी सुरू केलेल्या मोहल्ला लायब्ररीअंतर्गत बुधवारी, २१ रोजी नारेगाव येथील पटेल नगरमध्ये फातिमा अब्दुल हमीद खान मोहल्ला लायब्ररी सुरू करण्यात आली. या मोहिमेतील हे ३७ वे ग्रंथालय असून, त्याचे उद्घाटन मदरसा मआरिफुल कुरान व लत्तरबिया आणि अल-हुदा उर्दू हायस्कूलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी फाउंडेशनचे अध्यक्ष मिर्झा अब्दुल कय्युम नदवी म्हणाले, फाउंडेशनने वर्ष २०२६ मध्ये २६ नवीन ग्रंथालये स्थापन करण्याचा संकल्प केला आहे. २६ जानेवारी २६ रोजी पैठण तालुक्यातील श्वेता गाव येथे गिरीश मगरे मित्र परिवाराच्या सहकार्याने २




नवीन ग्रंथालयांचे उद्घाटन केले जाणार आहे.

शहरातील विविध कामगार वसाहत्यांसह झोपडपट्ट्यांमध्ये आतापर्यंत ३६ ग्रंथालये यशस्वीपणे सुरू असून, त्याद्वारे ३० हजारांहून अधिक मुले थेट वाचन संस्कृतीशी जोडली गेली आहेत. हे ग्रंथालय मुंबई येथील फिरोज खान यांच्या विशेष सहकार्याने त्यांच्या मातोश्री फातिमा अब्दुल हमीद खान यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू करण्यात आले आहे.

यावेळी मौलाना सय्यद बशीर नदवी यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, हे ग्रंथालय येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या उज्ज्वल भविष्यासाठी फायदेशीर ठरेल. अल-हुदा स्कूलच्या मुख्याध्यापिका समरीन सिद्दिकी यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे महत्त्व सांगून वाचन हा जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याचे आवाहन केले.

मुख्य अतिथी मौलाना अब्दुल गफ्फार काशफी म्हणाले, स्थानिक पातळीवर अशी ग्रंथालये असणे ही काळाची गरज आहे. इक्बाल देशमुख आणि मौलाना दाऊद मिली यांनीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका बुशरा बाजी, अंजुम नसाई आणि अल-हुदा स्कूलच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# अमरावतीत तिसरे अ. भा. एल्गार मराठी गजल संमेलन, ७ आणि ८ फेब्रुवारी रोजी आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

अमरावती- अमरावती येथे ७ आणि ८ फेब्रुवारी रोजी तिसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गजल संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनात महाराष्ट्रातील दीडशेहून अधिक गजलकार सहभागी होणार आहेत. हे संमेलन येथील श्री. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक नाट्यगृहात पार पडेल. सुरेश भट प्रतिष्ठान आणि वसंतराव पालेकर प्रतिष्ठान यांनी या संमेलनाचे यजमानपद स्वीकारले आहे.

प्रसिद्ध गजलकार सीए नाना लोडम यांची या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, प्रसिद्ध कवी व गजलकार वैभव जोशी हे संमेलनाचे अध्यक्ष असतील. मुंबईचे डॉ. राम पंडित यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन केले जाईल.

या संमेलनात एकूण १३ मराठी गजल मुशायरे आयोजित करण्यात आले आहेत. याशिवाय, एक तरन्नूम मुशायरा,




परिसंवाद आणि गजल गायन मैफिलही रंगणार आहे. संमेलनाध्यक्ष वैभव जोशी यांची सोबतीचा करार ही विशेष मैफल देखील होणार असल्याचे लोडम यांनी स्पष्ट केले.

यावेळी शाहीर सुरेशकुमार वैराळकर (पुणे), दगडू दादा लोमटे (अंबाजोगाई), संतोष बोरगावकर, डॉ. गणेश गायकवाड, शिवाजी जवरे आणि निवृत्त माहिती महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे यांसारखे अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. हे संमेलन अमरावती जिल्ह्याच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास लोडम यांनी व्यक्त केला.

संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. यात स्वागताध्यक्ष नाना लोडम, प्रसिद्ध वऱ्हाडी कवी नितीन देशमुख, अनंत नांदुरकर-खलीश, नवोदित गजलकार नितीन भट, कवी संजय इंगळे तिगावकर यांचा समावेश आहे. सहसमन्वयक म्हणून संदीप देशमुख, मारुती मानमोडे, निलेश कवडे, अजिज खान पठाण आणि रेणुका पुरोहित हे जबाबदारी सांभाळत आहेत.

अमरावती शहर हे विदर्भाची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते आणि कविवर्य सुरेश भट यांची ही गृहनगरी आहे. या शहरात मराठी गजलेची एक समृद्ध मेजवानी रसिकांना मिळणार आहे. शंभर वर्षांपूर्वी विदर्भ साहित्य संघाची स्थापना याच शहरात झाली होती, तसेच प्रसिद्ध मराठी गजलकार भीमराव पांचाळे हे देखील याच जिल्ह्याचे रहिवासी आहेत.

# गुरु तेग बहादूर आणि संत नामदेव : मूलभूत विचारांची समानता

**ज्योतिर्मय साहित्य**

''हिंद दी चादर'' नांदेड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष उपक्रम राबविण्यात येत असून, भारतीय सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा ही विविध संत, गुरू आणि विचारवंतांच्या योगदानातून समृद्ध झालेली आहे. या परंपरेत महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे अग्रणी संत नामदेव महाराज (इ.स. १२७०१३५०) आणि शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेग बहादूर साहिब (इ.स. १६२११६७५) हे दोन युगपुरुष वेगवेगळ्या काळात जन्मले. या दोघांमध्ये सुमारे तीन शतकांचे कालांतर असले, तरी त्यांच्या जीवनकार्याचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यास मूलभूत विचारधारेत लक्षणीय समानता आढळून येते. ही समानता अधोरेखित करण्याच्या दृष्टीने नांदेड येथे आयोजित करण्यात येणारा ''हिंद दी चादर'' हा विशेष उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतो.




**संत परंपरेचा समान मूल्याधिष्ठान** संत नामदेव महाराजांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून भक्ती, सत्य, साधेपणा आणि मानवी समता यांचा पुरस्कार केला. त्यांनी जात, वर्ण आणि कर्मकांडांवर आधारित भेदभावाला ठाम विरोध केला. ''ईश्वर सर्वत्र आहे'' ही भावना त्यांच्या विचारांचे केंद्रबिंदू होती.

त्याचप्रमाणे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांनीही ईश्वर एक असून तो सर्व मानवांचा आहे, असा सार्वत्रिक दृष्टिकोन मांडला. त्यांनी धार्मिक असहिष्णुता, अन्याय आणि जबरदस्तीविरुद्ध उभे राहून मानवमूल्यांचे संरक्षण केले.

**निर्भयता, सत्यनिष्ठा आणि बलिदान** संत नामदेव महाराजांनी सामाजिक अन्यायाविरोधात निर्भयपणे आवाज उठविला. सत्य आणि नामस्मरण हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी आपल्या रचनांमधून स्पष्ट केले.

**प्रभाकर बारहाते**
प्र. जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली

श्री गुरु तेग बहादूर साहिब यांनी सत्य, धर्मस्वातंत्र्य आणि मानवी स्वाभिमान यांसाठी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांनी स्वतःच्या धर्मापुरते मर्यादित न राहता इतर धर्मीयांच्या हक्कांसाठी प्राणांची आहुती दिली. त्यामुळे त्यांना ''हिंद दी चादर'' म्हणून गौरविण्यात येते.

**मानवी स्वातंत्र्य आणि आत्मसन्मान** संत नामदेवांनी माणसाच्या अंतःकरणातील शुद्धता आणि आत्मसन्मान यांना सर्वोच्च स्थान दिले. बाह्य आडंबरांपेक्षा अंतर्गत भक्ती व नैतिकता महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

गुरु तेग बहादूर साहिब यांनी व्यक्तिस्वातंत्र्य, विशेषतः धार्मिक स्वातंत्र्य, हा मानवी जीवनाचा मूलभूत अधिकार असल्याचा संदेश आपल्या आचरणातून दिला.

**''हिंद दी चादर'' उपक्रमाचे महत्त्व**

नांदेड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समागमानिमित्त आयोजित करण्यात येणारा ''हिंद दी चादर'' हा विशेष उपक्रम केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सर्वधर्मसमभाव यांचा संदेश देणारा आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिब यांच्या त्याग, बलिदान व मानवतावादी विचारांचा प्रसार करण्यात येत असून, त्याचबरोबर महाराष्ट्राच्या संत परंपरेतील संत नामदेव महाराजांच्या विचारांशी असलेली वैचारिक समानता अधोरेखित करण्यात येत आहे.

**सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मता**

संत नामदेव महाराज आणि गुरु तेग बहादूर साहिब यांच्या विचारधारेमुळे समाजात सहिष्णुता, बंधुता आणि समतेची भावना दृढ झाली. या दोन्ही महापुरुषांचे विचार आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतही मार्गदर्शक ठरतात.

''हिंद दी चादर'' या उपक्रमातून विविध धर्म, पंथ आणि समाजघटकांमध्ये परस्पर सन्मान व समन्वयाची भावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

संत नामदेव महाराज आणि श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्यात जरी तीन शतकांचे कालांतर असले, तरी सत्य, निर्भयता, मानवी स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि ईश्वरभक्तीची सार्वत्रिक भावना ही दोघांच्या विचारधारेची समान सूत्रे आहेत. नांदेड येथे आयोजित ''हिंद दी चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष उपक्रम हा या महान परंपरेचे स्मरण करून देणारा व भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारा उपक्रम आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559